**ठळक बातम्या**

- राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्यासाठीचा रोडमॅप तयार असून हे उद्दिष्ट २०२९ मधेच साध्य होईल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास
- भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले हुतात्मा क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना देशाची आदरांजली
- नागपूरमधे हिंसाचारानंतर लागू केलेली संचारबंदी पूर्णपणे उठवली, मात्र पोलीस बंदोबस्त कायम

**आणि**

- खेलो इंडिया पॅरागेम्स नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या सागर कातळे याला १० मीटर एअर रायफल प्रोन मिक्स्ड एसएच वन प्रकारात सुवर्णपदक

**<><><><><>**

राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्यासाठीचा रोडमॅप तयार असून हे उद्दिष्ट २०२९ मधेच साध्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त  केला. सीआयआय यंग इंडियन्सच्या पश्चिम क्षेत्र परिषदेच्या तीन दिवसीय बैठकीचा समारोप आज नाशिकमधे झाला, यात मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधा महत्वाच्या आहेत, त्या दृष्टीनं समृद्धी महामार्ग तयार झाला असून शक्तिपीठ महामार्गही तयार केला जात असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. देशात सर्वाधिक परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे, राज्यात शाश्वत विकासाला प्राधान्य दिलं जात आहे असं फडनवीस म्हणाले.

नाशिकहून वाढवण बंदरापर्यंत ग्रीन फिल्ड रोड तयार केला जाणार असून त्याचा लाभ नाशिकला मिळेल असं त्यांनी सांगितलं. उद्योगासोबतच कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सरकार प्रयत्नशील आहे, नाशिक हे प्रगत शेतीसाठी ओळखलं जातं, नाशिकनं कृषी क्षेत्रात मूल्यवर्धित साखळी विकसित केली आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं कुंभमेळ्याची पूर्वतयारी वेगानं करण्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण स्थापन केलं जात असून प्रयागराजच्या धर्तीवर लवकरच कायदा केला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. त्यांनी आज नाशिकमध्ये आज कुंभमेळा तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. त्र्यंबकेश्वर विकास आराखड्याला मान्यता दिली आहे. नाशिकमध्ये गोदावरी नदीच्या शुध्दीकरणासाठी खासगीकरणातून कामं केली जाणार असून पुढच्या महिन्यात या कामाला सुरूवात होईल, कुशावर्त तीर्थाचं पाणी शुध्द करण्यासाठी नगरपालिकेनं तयारी केली असून त्यांना लवकर कामं करण्याच्या सूचना दिल्या आहेत, असं फडनवीस यांनी सांगितलं.

कांदा उत्पादक शेतकऱ्याला राज्य सरकार मदत करत राहिल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी दिली.

कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले तीन वीर क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना संपूर्ण देश आज श्रद्धांजली वाहत आहे. १९३१ मध्ये आजच्याच दिवशी लाहोरच्या मध्यवर्ती तुरुंगात या तीन वीरांना फाशी देण्यात आली होती. या दिवसाचं शहीद दिन म्हणून स्मरण करण्यात येतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या तिन्ही वीरांना श्रद्धांजली वाहिली आहे. समाजमाध्यमावर मोदी यांनी भगत सिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या बलिदानाचं स्मरण केलं आहे. स्वातंत्र्य आणि न्यायासाठी या क्रांतीकारकांनी दाखवलेलं दुर्दम्य साहस आणि सर्वोच्च बलिदान देशवासियांना प्रेरित करेल, त्यांनी म्हटलंय. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईत राजभवन इथं भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी शहीद दिनानिमित्त आज सकाळी नाशिकच्या शासकीय विश्रामगृहात भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी समाजमाध्यमावर या शहीद क्रांतिकारकांना अभिवादन केलं आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेत, आणि नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठातही आज शहीद क्रांतिकारकांना आदरांजली वाहण्यात आली. नवी दिल्लीत महाराष्ट्र परिचय केंद्रातही शहीदांना अभिवादन करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्याची आर्थिक परिस्थिती रुळावर येताच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची मदत २१०० रुपये करू असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार

यांनी आज नांदेड इथं दिलं. लाडकी बहीण योजना बंद केली जाणार नाही असं स्पष्ट करत राज्याची तिजोरी रिकामी झाल्याचा विरोधकांचा दावा खोटा असल्याचं पवार म्हणाले. यावेळी माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

**<><><><>**

बीड जिल्ह्यात अनुसूचित जाती जमातींविरोधात अत्याचाराच्या तक्रारींसंदर्भात राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष आणि सचिव धर्मपाल मेश्राम यांनी आज शिरूर कासार आणि आष्टी इथं भेट दिली. शिरूर कासार इथं आदिवासी पारधी समाजाच्या वस्तीवर वनविभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत जाळपोळ झाल्याच्या तक्रारींसंदर्भात त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली, आणि चौकशी करण्याचं आश्वासन दिलं. आष्टी तालुक्यात जामगाव इथं मातंग कुटुंबातल्या कर्त्या पुरुषाची हत्या झाल्याप्रकरणी येत्या १५ दिवसात सामाजिक न्याय विभागानं कार्यवाही करावी असं त्यांनी सांगितलं. तसंच मयताच्या मुलांना शासकीय नोकरी मिळावी अशी शिफारस करण्याचं आश्वासन दिलं.

**<><><><>**

वेव्हज् यंग फिल्ममेकर स्पर्धेसाठी देशभरातून तेराशेपेक्षा जास्त स्पर्धकांनी नाव नोंदणी केली आहे. यातल्या वीस स्पर्धकांची अंतिम यादीत निवड झाली आहे. अमोल गुप्ते आणि चैतन्य चिंचलीकर यांचं मार्गदर्शन तसंच व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनलची मदत या स्पर्धकांना मिळाली. व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनलमधे मार्गदर्शन तसंच प्रशिक्षण दिलं जातं.

**<><><><><>**

नागपूरमधे गेल्या आठवड्यात झालेल्या हिंसाचारानंतर लागू केलेली संचारबंदी आता पूर्णपणे उठवली आहे. नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी आज दुपारी ३ वाजल्यापासून संचारबंदी पूर्णपणे उठवण्याचे आदेश जारी केले.

गेल्या सोमवारी झालेल्या हिंसक प्रकारानंतर कोतवाली, गणेशपेठ, तहसील, लकडगंज, पाचपावली, शांतिनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोधरानगर आणि कपिलनगर या ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू केली होती. त्यापैकी काही भागातली संचारबंदी २० मार्चला, तर आणखी काही भागातली संदारबंदी काल उठवली. उर्वरित भागातली संचारबंदीही आज दुपारी ३ वाजल्यापासून उठवण्याचे आदेश पोलिस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी दिले. संवेदनशील भागात स्थानिक पोलिसांची गस्त सुरु राहील. तसंच बंदोबस्तही कमी होणार नाही असं सिंघल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरागेम्सच्या नेमबाजी स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या सागर बाळासाहेब कातळे याने १० मीटर एअर रायफल प्रोन मिक्स्ड एसएच वन प्रकारात सुवर्णपदक मिळवलं आहे. मोना अग्रवाल हिने या रौप्य तर दीपक सैनी याने कांस्यपदक जिंकलं आहे. काल भारताची पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेती अवनी लेखरा हिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टँडिंग एसएच वन प्रकारात सुवर्ण पदक पटकावलं होतं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथं सुरु असलेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादनं राजस्थान रॉयल्सपुढं विजयासाठी २८७ धावांचं आव्हान ठेवलं आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. सनरायझर्स हैदराबादनं निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून २८६ धावा केल्या. ईशान किशनच्या नाबाद १०६ धावांचा त्यात मोठा वाटा आहे. ट्रॅविस हेडनं ६७ धावांचं योगदान दिलं.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सची सुरुवात खराब झाली. यशस्वी जैसवाल १ तर कर्णधार रियान पराग ४ धावा काढून तंबूत परतल्यामुळे दुसरं षटक संपण्याआधीच त्यांची स्थिती २ बाद २४ अशी झाली. शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या १५ षटकात ५ बाद १६९ धावा झाल्या होत्या.

आजचा दुसरा सामना मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होईल. चेन्नई इथं सायंकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होईल. चेन्नई सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या शासकीय शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम राबवण्याविषयीची संपूर्ण माहिती येत्या दोन दिवसांत विधानसभेत दिली जाणार आहे, असं शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सांगितलं. नाशिकमध्ये ते आज बातमीदारांशी बोलत होते. सीबीएसई अभ्यासक्रम राबवण्याच्या सरकारच्या निर्णयाबाबतचे गैरसमज दूर केले जातील. त्यानंतर या अभ्यासक्रमाचं सर्व स्तरात स्वागत होईल, असा विश्वासही भुसे यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात  किंचित घट झाली आहे.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ब्रम्हपुरी इंथ ३९ पूर्णांक  ३ दशांश अंश सेल्सिअस तर  सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगर इथं १५ पूर्णांक ७ शतांश  अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता  पुणे वेधशाळेचा व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**